# मॅन्युअल 15

## माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील

गेल्या काही वर्षांमध्ये विभागाने दस्त नोंदणी प्रक्रियेत आमूलाग्र बदल केले आहेत. सन 2002 पासून दस्त नोंदणीसाठी संगणकीकृत प्रणालीचा (SARITA) वापर सुरू करण्यात आला.

सन 2012 पासून संगणकीकृत दस्त नोंदणी प्रणाली मध्यवर्ती पध्दतीने (i-SARITA) सुरू करण्यात आली. तसेच ई-पेमेंट, ई-फायलिंग व ई-सर्च यासारख्या विविध ई-उपक्रमांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली.

सन 2014 पासून विभागाने मोठया गृहबांधणी प्रकल्पातील सदनिका विक्रीचे करारनामे आणि लिव्ह अँन्ड लायसन्सचे (भाडे करार) दस्त नागरिकांना दुय्यम निबंधक कार्यालयात न येता ऑनलाईन सुविधेव्दारे दस्त नोंदविता येतील अशी ई-रजिस्ट्रेशन प्रणाली देशामध्ये पहिल्यांदा सुरू करून गतिमान व लोकाभिमुख प्रशासनाचे ध्येय साध्य करण्याचे दृष्टीने क्रांतिकारी पाऊल उचलले आहे.

नागरिकांची सनद व सारथी हे विभागाच्या माहितीचे पुस्तक नागरिकांसाठी विभागाच्या खालील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

Web Site Address :- www.igrmaharashtra.gov.in

Web Site Address :- igrmahahelpline ,

Ph. No. 8888007777

या शिवाय मोबाईल अप्सवर (Mobile Apps) वर देखील माहिती उपलब्ध आहे.

जनतेच्या सोईसाठी विभागाच्या उपरोक्त वेबसाईटवर खालील ऑनलाईन सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत.

1) ई सर्च

2) ई एएसआर

3) पीडीई(रजि.)

4) ई पेमेंट

5) ई रजिस्ट्रेशन

6) ई स्टेप इन

7) ई फायलिंग

8) ई पीडीई फायलिंग